MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२४० | गुरूवार दि.२३ मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -240 | THURSDAY DT. 23 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## मृतदेह सापडला नाही, ढाक्यात ३ अटकेत

कोलकाता – बांगलादेशचे खासदार अनवरुल अझीम अनार (५६) यांची कोलकाता येथे हत्या करण्यात आली आहे. अझीम १२ मे रोजी येथे पोहोचजं होते आणि १३ मे पासून बेपत्ता होते. बुधवारी सकाळी बांगलादेशचे गृहमंत्री असदुझ्झमान खान यांनी ढाका येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, अझीम यांची हत्या करण्यात आली आहे. ही पूर्वनियोजित हत्या आहे. याप्रकरणी ढाका येथून तीन बांगलादेशींना अटक करण्यात आली आहे. अझीम कोलकात्यातील न्यू टाऊन भागात एका आलिशान फ्लॅटमध्ये थांबले होते. ज्या ड्रायव्हरने त्यांना येथे सोडले होते, त्याच्या सांगण्यावरून पोलिसांनी छापा टाकला असता अझीम तेथे सापडले नाहीत. मात्र खुनाचे अनेक पुरावे मिळाले. या प्रकरणाचा तपास करत असलेले सीआयडीचे आयजी अखिलेश चतुर्वेदी यांनी सांगितले की, आम्हाला मृतदेह सापडला नाही.

# माजलगावच्या तहसीलदार वर्षा मनाळे यांचा काळे नेमका कोण ड्रायव्हर कोतवाल का वसुली अधिकारी?



- सोशल मीडियावर वाळू माफियांचा फेसबुक व्हाट्सअप इन्स्टा वर रिल टाकून पोलीस महसुल प्रशासनाला आव्हान
- पुरुषोत्तमपुरी टाकरवन मंजरथ गोदा पात्रातून अवैध वाळू उपसा जोरात तहसीलदार वर्षा मनाळे दिसत नाही का
- तहसीलदार वर्षा मनाले यांनी कोतवाल असलेल्या काळे नावाच्या व्यक्तीला आपल्या गाडीचा ड्रायव्हर म्हणून कोणत्या पदावर कोणाला घ्यायचा हा निर्णय स्वतः:च घ्यायचं ठरवला आहे का?
- कोतवाला ड्रायव्हरची पदोन्नती देऊन कोतवाल कडून ड्रायव्हरचे काम करून आर्थिक व्यवहाराची सर्व जबाबदारी ही काळीवर दिल्याची चर्चा माजलगाव शहरांमध्ये जोर धरू लागली आहे
- वाळूमाफियांमध्ये काळे व तहसीलदार वर्षा मनाली यांच्यामधील दुवा म्हणून काळे यांची ओळख आहे
- काळे हा नेमका कोतवाल आहे का ड्रायव्हर आहे का वसुली अधिकारी आहे याचीच शहानिशा करणे
- आता बाकी राहिले असून माजलगाव तालुक्यातील अनेक वाळू माफिया चे ट्रॅक्टर टिप्पर हे तहसीलदार मनालींच्या डोळ्यासमोरून जाताना दिसत नाहीत का असावा माजलगाव मतदार संघामध्ये जनतेला पडला आहे
- महसूल प्रशासनाच्या आशीर्वादाने वाळू माफियाचा माजलगाव शहरासह तालुक्यात नंगानाच उपविभागीय अधिकारी व तहसीलदार अवैध वाळू उपसा जोरात.

माजलगाव ।प्रतिनिधी


माजलगाव तालुक्यातील टाकरवन पुरुषोत्तम पुरी मंदिरात सह अनेक गावातील गोदापात्रेसह नदी नाल्यातील वाळू उपसा करण्यासाठी वाळूमाफिया मोकळा असताना यावेळी महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन सुद्धा आहे परंतु यावेळी नक्कीच याच पोलीस प्रशासन व महसूल चक्क कर्मचाऱ्यांनाच चालवला आहे आर्थिक देवाण घेण्यासाठी कोतवाल ड्रायव्हर वसुली अधिकारी केलेले आहेत असं चित्र स्पष्ट होत असतानाच वर्षा मनाली असतील किंवा पोलीस प्रशासन ग्रामीण किंवा शहर असेल यांना मात्र कधीच वाळू भारतीयांनी उपसा केलेली वाळू पकडण्यात यश आलेलं नाही तर यावेळी वाळूमाफिया हा त्यांना हात करून निघून जातो परंतु ते त्यांच्या कारवाई का करत नसतील असाही सवाल यावेळी माजलगाव ते जनतेला पडलेला आहे.

माजलगाव तालुक्यात कुठेही वाळूचे अधिकृत टेंडर नसताना सुद्धा मोठ्या प्रमाणात माजलगाव शहरासह परिसरात बांधकामे सुरु असून सदरील बांधकामाला वाळूमाफिया महसूल प्रशासनाच्या अर्थपूर्ण बाबीमुळे सर्वत्र वाळू मिळत आहे. यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असून वाळू माफिया बाळूचा ज्यादा भाय लावून लोकांची आर्थिक लूट करत असल्याचे दिसून येत आहे.

## वाळू माफिया किती जणांना गोदामातेचे पोट फाडून नोटा कमवून देतात?







### पुरुषोत्तम पुरी येथील अवैधरित्या वाळू उपशाला तहसीलदार वर्षा मनाळे यांचा वरदहस्त

पुरुषोत्तम पुरी परिसरात वाळू माफियांचे वाळू माफी यांचे जाळे तरीही डोळे बंद करतात तहसीलदार वर्ष मनाली.....पुरुषोत्तम पुरी येथे अवैधरित्या ५०० ब्रास वाळू साठा कोणाच्या आशीर्वादाने करण्यात आला.....पुरुषोत्तम पुरी परिसरात वाळू माफी यांचा सुळसुळाट दिवसा ढवळ्या जेसीबीने वाळू काढली जाते तसेच वाळू काढताना त्याचे व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर टाकले जातात फिल्मी स्टाईलने वाळू चोरी केली जाते तरीही तहसीलदार वर्षा मनाळे व प्रशासन लक्ष देत नाही याचा अर्थ हे मॅनेज झालेले आहेत का असे प्रश्न उपस्थित होत आहेत....

माजलगाव तालुक्याला गोदावरी नदीने विळखा घालून तिला भेटलेली सिंदफणा या उपनदीत मोठ्या प्रमाणात वाळू असून शासनाने गेल्या दोन वर्षापासून कसलीही वाळूचा लिलाव न केल्याने बाळू माफियांनीगोदावरी नदीचा सिंदफना नदी पोखरून मोठ्या प्रमाणात बाळूची तस्करी असल्याचा प्रकार सर्वत्र उघड असतानाही माजलगाव उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले व तहसीलदार वर्षा मनाले यांचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याने बाळू माफियांनी मोठ्या प्रमाणात बाळू

तस्करीचा नंगानाच सुरू केला. यामुळे शासनाचा करोड रुपयाचा महसूल बुडाला तर एकीकडे वाळूबंदीच्या नावाखाली बांधकाम करणाऱ्या लोकांकडून दहा हजार रुपयाला एक ब्रास वाळू विक्री करून आर्थिक लूट करत असल्याचा प्रकार सुरू आहे. याला माजलगाव

तहसिलदार व उपविभागीय यांचे खबरी माहीती देत नसतील का?

माजलगाव तहसीलदार जबाबदार असून याच्याकडे त्यांचेअर्थ पूर्ण दुर्लक्ष होत करत आहेत?

.सदरील सदरील बाजू माफिया है हिवरा, सादोळा, महातपुरी, पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, आडोळा, गंगामसला, शुक्लेश्वर तीर्थ लिमगाव, मोगरा या गोदापात्रातील वाळूचा माजलगाव उपविभागीय महसूल अधिकारी व तहसीलदार यांचे दुर्लक्ष का होत आहे. असा सवाल सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे

वाहतुकीबाबत महसूल प्रशासनापेक्षा पोलीस प्रशासनाची करडी नजर असून यापूर्वी अनाधिकृत वाळू बाबत जेवढ्या जेवढ्या कारवाया झाल्या त्या पोलिसांनी पकडल्यामुळेच झाल्या आहेत मात्र सध्या माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन व माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या अधिकारी कर्मचारी यांना रात्रीची गस्त घालत असताना रात्रभर वाळूची तस्करी करणारे एकही वाहन कसे सापडले नाही? याबाबत आश्वर्य व्यक्त केले जात आहे. उपसा करून पात्राच्या बाहेर मोठ्था प्रमाणात वाळूचा साठा करून याच ठिकाणाहून बाळूच्या हजारो ब्रास ची तस्करी बिन बीमाट होत असून माजलगाव शहर ज्या ज्या ठिकाणी बांधकामे चालू आहेत त्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळूचे ढिगारे दिसत आहेत.

यापूर्वी असाच प्रकार होत असताना तात्कालीन तहसीलदार डॉक्टर प्रतिभा गोरे यांनी सदरील वाळू बाबत धसक मोहीम राबवत ज्या ज्या बांधकामावर वाळू आहे त्यांच्याकडून वाळू बाबत योग्य खुलासा न मिळाल्यास कारवाई करण्यात आल्या होत्या. मात्र आज याकडेमाजलगाव उपविभागीय महसूल अधिकारी व तहसीलदार यांचे दुर्तश का होत आहे. असा सवाल सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

आज पर्यंत अनाधिकृत वाळू वाहतुकीबाबत महसूल प्रशासनापेक्षा पोलीस प्रशासनाची करडी नजर असून यापूर्वी अनाधिकृत वाळू माफिया पोलिसांनी पकडल्यामुळेच झाल्या आहेत मात्र सध्या माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन व माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या अधिकारी कर्मचारी यांना रात्रीची गस्त घालत असताना रात्रभर वाळूची तस्करी करणारे एकही वाहन कसे सापडले नाही? याबाबत केले जात आहे.

## राज्यात उष्णतेची लाट येणार, अवकाळीचा जोरही कायम राहणार, हवामानचा नेमका अंदाज काय?

मुंबई : राज्यातील तापमानात सातत्यानं वाढ होत आहे. कुठं उन्हाचा चटका बसत आहे. तर कुठं अवकाळीचा जोर पाहायला मिळत आहे. दरम्यान, संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, नंदुरबार, धुळे जळगांव, नाशिक, अहमदनगर अशा २४ जिल्ह्यात दुपारचे कमाल तापमान सरासरीपेक्षा ४ ते ६ डिग्री से. ग्रेड ने अधिक वाढणार आहे. म्हणजे ४० ते ४४ डिग्री से. ग्रेड दरम्यानचे राहणार असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पण या स्थितीतही अवकाळीची शक्यता कायम राहणार आहे.

आजपासून पुढील तीन दिवस म्हणजे शनिवार दिनांक २५ मे पर्यंत उष्णतेच्या लाटेची स्थिती जाणवू शकते अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

पुढील तीन दिवस गुजरात राज्य आणि मुंबईसह कोकणातील ७ जिल्ह्यात उष्णतेची लाटसदृश स्थितीसहित दमटयुक्त उष्णतेची स्थिती जाणवेल. विशेषतः या उष्णतेचा प्रभाव मुंबई शहर, ठाणे, पालखेड येथे अधिक जाणवेल, अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली.

अवकाळीची शक्यता कायम

उष्णतेची लाट सदृश्यस्थिती असली तरी संपूर्ण महाराष्ट्रात आजपासून पुढील तीन दिवस म्हणजे २५ मे पर्यंत ढगाळ वातावरणासहित तुरळक ठिकाणी किरकोळ अवकाळी पावसाची शक्यता कायम आहे. गुरुवार, शुक्रवार म्हणजेच दिनांक २३ आणि २४ मे असे दोन दिवस दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड या ८ जिल्ह्यात अवकाळीची शक्यता अधिक जाणवेल अशी माहिती माणिकराव खुळे यांनी दिली.

मराठवाड्यासह विदर्भातील १९ जिल्ह्यात २४ मे पासून अवकाळीचे ढगाळ वातावरणही निवळेल. तर मुंबईसह कोकण, खान्देश, नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर येथे मात्र २४ मे नंतरही वातावरण टिकून राहील. दरम्यान, अंदमानवर पोहोचलेल्या मान्सूनची आगेकूच कायम असून बंगालच्या उपसागरात आठवड्यादरम्यान कदाचित चक्रीवादळाच्या बीज-रोवणीही होवु शकते असे वाटते. अवकाळी पावसाचा शेती पिकांना मोठा फटका

दरम्यान, सध्या सुरु असलेल्या अवकाळी पावसाचा मोठा फटका काही भागातील शेती पिकांना बसला आहे. शेतकऱ्यांची हाती आलेली पिकं वाया गेली आहेत. विशेषत: फळबागांसह भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान, अशाच स्थितीत आणखी अवकाळी पावसाची शक्यता सांगितली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना चिंता वाटत आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सरकारकडे मदतीची मागणी केली आहे.

# बीड जिल्हा दुष्काळ व दुष्काळ सदृश्य घोषित

### परिस्थितीनुसार विविध सवलती लागू करण्यास सरकारची परवानगी

बीड ।प्रतिनिधी

जिल्हयामध्ये जून ते सप्टेबंर २०२३ या कालावधीतील पर्जन्याची तुट, उपलब्ध असलेल्या भुजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पिकांची परिस्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांमध्ये आपतीची शक्यता विचारात घेवून शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. ३१ ऑक्टोबर २०२३ दि. १६ फेब्रुवारी २०२४ व ११ नोव्हेंबर २०२३ अन्वये वडवणी, धारुर आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये गंभीर स्वरुपाचा दुष्काळ व बीड जिल्हयातील बीड, गेवराई, शिरुर, माजलगाव, केज, परळी, आष्टी आणि पाटोदा या तालुक्यातील महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करुन विविध सवलती लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

बीड जिल्हयामध्ये आवश्यक तेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा टँकरव्दारे करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार टँकर मंजूरीचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. पाणीटंचाईच्या अनुषंगाने टँकर मंजूरीबाबत काही अडचण असल्यास संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी व पाणी टंचाईविषयी काही तक्रार, अडचण असल्यास कार्याकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जिल्हयात कोठेही जनावरांच्या चा-याबाबत टंचाई भासत असेल तर डॉ. आर. डी. कदम, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. संपर्कासाठी दुरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.



नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड दुरध्वनी क्रमांक ०२४४२-२९९२९९, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड,भ्मणध्वनी क्र. ८६६८३८१२१५,उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड, (बाळू घोलप) ९९२२८४६४६५, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा (बाबर शेख) ९९७०६६५११५, उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव, (गणेश जवादे) ९७६७७५४५०१, उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई (सुर्यकांत गायकवाड) ९९७०८९५६२२, उपविभागीय अधिकारी परळी (बी.एल. रुपनर )९४२२९३०५४२ आणि जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कार्यालय बीड दूरध्वनी ०२४४-२९७०२२ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी केले आहे.

# माजलगाव तालुक्यात पुन्हा बिबट्याची दहशत

माजलगाव (प्रतिनिधी)

गेल्या दोन-चार महिन्यापूर्वी बिबट्याच्या वावराने भयभीत झालेल्या माजलगाव तालुक्यात पुन्हा बिबट्याची दहशत पसरताना दिसत आहे.मंगळवार दि.२० रोजी तालुक्यातील रामपिंपळगाव येथील एका शेतकऱ्याच्या शेतात बांधलेल्या दोन वर्षाच्या वासराचा बिबट्याने फाडशा पाडला.दरम्यान घटनेनंतर वन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली असून बिबट्याच्या वावराने गावकऱ्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.

गेल्या दोन-चार महिन्यापूर्वी माजलगाव तालुक्यात बिबट्याने अनेक जनावरांचा फडशा पाडला होता.बिबट्याच्या दहशतीने माजलगाव तालुका परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.लहान मुलं, महिलांचे घराबाहेर पडणे बंद झाले होते.यावर उपाययोजना करण्यासाठी वन अधिकारी यांनी कमालीचे प्रयत्न केले होते.काही सामाजिक संघटनांनी यात सहभागी होत वन अधिकाऱ्यांना सहकार्य केले होते.अनेक ठिकाणी शेतात बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे बसवण्यात



आले होते.अशा उपायोजना करूनही बिबट्या वन अधिकाऱ्यांच्या हाती लागत नव्हता. कित्येक दिवस तो दिवसाआड पशुधनाची शिकार करत बेभान सुटला होता.दरम्यानच्या काळात परिसरातील नागरिकात भीतीचे वातावरण पसरले होते.शाळकरांनी मुलांनी शाळेत जाणे सोडले होते तर महिलांनी घराबाहेर पडणे बंद केले होते.दरम्यान दोन-तीन महिन्यापूर्वी त्याची दहशत कमी झाल्याने बिबट्या परिसरातून गेला असल्याची समज करून नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला होता. त्याच बिबट्याची दहशत मंगळवारच्या रात्री मंगरूळ शिवारात दिसून आली.राम पिंपळगाव येथील राजेभाऊ येवले या शेतकऱ्याच्या शेतात बांधलेल्या दोन वर्षाचा वासराचा त्याने फडशा पाडला. त्यामुळे बिबट्याच्या अस्तित्वाने पुन्हा माजलगाव तालुक्यात भितीचे वातावरण पसरले आहे.दरम्यान घटनेच्या काही काळात घटनास्थळी वनाधिकाऱ्यांनी भेट दिली.परिसराची पाहणी केली.पंचनामे केली आहेत.





**श्री संत भगवान बाबा उच्च माध्यमिक विद्यालय पांगरी कॅम्प तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड च्या निकालाची यशस्वी परंपरा कायम ठेवत प्रथम- कु.जाधव वैष्णवी बबन-४३३/७२.१७% रा. कौडगाव साबळा. द्वितीय- कु. केंद्रे वैष्णवी गणेश-४२५/७०.८३% रा.कौठळी. तृतीय- कु.कसबे ऐश्वर्या राजीव-४२१/७०.१७% रा. परळी वैजनाथ यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रीमान फुलचंद रावजी कराड साहेब यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.**

# नवीन लोकसभा स्थापन होईपर्यंत राज्यात आचारसंहिता कायम राहणार !

निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद

लोकसभा निवडणूक देशभरात पार पडते आहे. महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया पार पडली आहे. यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. नेमकं काय म्हणण्यात आलं? वाचा सविस्तर... महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया संपताच निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद; म्हणाले, 'तोपर्यंत' आचारसंहिता लागू असणार

देशात सार्वत्रित लोकसभा निवडणूक होत आहे. पाच टप्प्यातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे. अजून दोन टप्प्यातील मतदान होणं बाकी आहे. मात्र महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया पूर्ण होताच राज्य निवडणूक आयोगाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली आहे. सहसचिव तसंच महाराष्ट्राचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. महाराष्ट्रात राबवण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेवर त्यांनी भाष्य केलं आहे.

### आचारसंहितेवर काय म्हणाले?

महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र देशातील दोन टप्प्यातील महदान होणं अद्याप बाकी आहे. या पार्श्वभूमी आचारसंहितेवर किरण कुलकर्णी यांनी प्रतिक्रिया दिली. नवीन लोकसभा स्थपण होई पर्यंत ही आचारसंहिता कायम राहणार आहे. मुख्य सचिव यांच्यामार्फत काही प्रस्ताव आमच्याकडे आले होते. ते आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवले ते पावसाळ्याआधी काही महत्त्वाची कामे करण्यासंबंधी त्यावर निवडणूक आयोगाने आचारसंहिता शिथिल करण्यासंबंधी परवानगी दिली आहे. मात्र पूर्ण आचारसंहिता शिथिल होणार नाही, असंही किरण कुलकर्णी यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्रातील मतदान प्रक्रिया

महाराष्ट्र राज्यातील मतदान प्रक्रियेवर त्यांनी भाष्य केलं आहे. पाचव्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया संपन्न झाली आहे. १३ लोकसभासंघात मुंबई बद्दल जर बोलायचं म्हटलं तर ६ लोकसभा मतदार संघात १२ हजार पोलिंग बूथ आहेत. या पोलिंग बुथवर व्यवस्थित प्रक्रिया पार पडली आहे. फक्त १० ते १२ ठिकाणी स्लो प्रक्रिया होत्या. ईव्हीएम किंवा इतर अडचणी दूर केल्या आहेत . रिझर्व स्टॉक मधील ईव्हीएम उपलब्ध केल्या आहेत. त्यावेळी लवकरच अर्धा तासाच्या आधी राजकीय पक्षांनी केलेल्या आरोपावर मी बोलणार नाही, असं किरण कुलकर्णी यांनी म्हटलं आहे.

यंदाच्या निवडणुकीत अनेक मतदारांची मतदार यादी नावंच नसल्याचं समोर आलं आहे. यावरही किरण कुलकर्णी यांनी भाष्य केलं आहे. मतदानाच्या दिवशी आपलं नाव मतदार यादीत आहे की नाही हे तपासणं योग्य नाही. सुजाण नागरिकांना हे लक्षात आलं पाहिजे. आम्ही २१ एप्रिल रोजी जाहिरात दिल्या होत्या. नाव तपासून घेण्यासंदर्भात.आता त्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. ते विधानसभेला कामाला येईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

# गेवराई तालुक्यातील तलवाड्यात बीफवर बंदी

## गेवराईत मात्र बीफ विक्रत्यांना खाकीचा आशीर्वाद!

गेवराई ।प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेच्या कलम ४८ मधील मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र शासनाने १९७६ चा प्राणीरक्षण कायदा राज्यात लागू केलेला होता. या कायद्यानुसार महाराष्ट्रात फक्त गाय व वासरू यांच्या हत्येस प्रतिबंध होता. त्यामुळे बैल व वळू यांची सर्रास हत्या केली जात होती. याचा परिणाम म्हणून संपूर्ण गोवंशच धोक्यात आला होता. पहिल्या शिवसेना-भाजपा (युती) सरकारने १९९५ मध्ये गोवंश हत्या प्रतिबंधक (सुधारणा) विधेयक दोन्ही सभागृहामध्ये मंजुर करून १९९६ मध्ये राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी पाठवले. परंतु त्यात अनेक त्रुटी असल्यामुळे केंद्राने तो राज्याकडे परत पाठवला होता. दरम्यान आघाडीचे सरकार सत्तेवर आले व त्या कायद्याचा पाठपुरावा केला गेला नाही किंवा तसा अभिप्राय केंद्राला पाठवला नाही. म्हणून हा कायदा तसाच पडुन राहिला. महाराष्ट्रात पुन्हा २०१४ मध्ये भाजपा-शिवसेना पक्षाचे (युती) सरकार सत्तेत आल्यानंतर या सरकारने केंद्राला



अभिप्राय पाठवून कायदा करण्याची तयारी दर्शवली व त्याचा पाठपुरावा केला. या गोष्टींचा परिणाम म्हणून गेली १९ वर्ष रखडलेला कायदा दि. २६ फेब्रुवारी २०१५ रोजी मा. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या स्वाक्षरीने संमत झाला. दि.४ मार्च २०१५ पासून महाराष्ट्र राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी (सुधारणा) कायदा महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून तत्काळ लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमास महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ असे नामाभिदान देण्यात आले. या सुधारित कायद्यानुसार 'दुधासाठी, पैदाशीसाठी, ओझी वाहण्याच्या कामासाठी किंवा शेतीविषयक प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेल्या गायींची, वळुची व बैलांची कत्तल करण्यास मनाई करण्यात आलेली आसतांना यावर कुठेच आमल बजावनी होतांना दिसली नाही परंतु दुर्गंधी येत आसल्याचे कारण पुढे करत तलवाडा पोलीसांच्या वतीने तलवाड्यात बीफ विक्रत्यांना बीफसाठी होणा-या कत्ली बंद करण्याच्या सूचना दिल्या गेल्याची चर्चा होतांना ऐकन्यास मिळत आहे.

# दिवाळीत न.प.,जि.प.,पं.स.च्या निवडणुकांचे फटाके फुटणार

## लोकसभेच्या निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर होणार


बीड /प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीचा निकाल चार जूनला लागल्यानंतर लगेचच सप्टेंबर ते ऑक्टोंबरम्यान म्हणजेच दिवाळीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी महायुतीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. शिवाय ओबीसी आरक्षणासंदर्भात १२ जुलै रोजी 'सर्वोच्च' सुनावणी असून त्यात निकाल येण्याची शक्यता आहे. त्यामुळे लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगूल वाजण्याचे संकेत आहेत. त्यामुळे गट गणांसह नगरपालिका प्रभागांतील इच्छुक पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे दिसणार आहे.

महायिकास आघाडीचे सरकार असताना राज्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचे नवीन गट आणि गाणांची रचना झाली होती. जुने गट- गण तोडून नव्याने रचनाही झाली होती. आरक्षण सोडतीची प्रक्रियाही पूर्ण झाली होती. मात्र त्यानंत्तर महायुतीचे सरकार सत्तेत आले आणि

त्यांनी वाढीव गटसंख्या, प्रभाग रचनेचा निर्णय बदलला. याशिवाय ओबीसी आरक्षणाबाबतही सर्वोच्च न्यायालयात खटला सुरू झाला.ओबीसी आरक्षण प्रभागरचना आणि वाढलेली गट-गण व सदस्यांची संख्या अशा तीन मुद्द्यांवरून याचिका दाखल झाल्या होत्या. दोन वर्षांपासून यावरच सुनावणी सुरू आहे. दरम्यान, राजकीय स्थितीचा अंदाज बांधत महायुती सरकारही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी फारसा रस दाखवत नसल्याचे दिसले. परिणामी, जिल्हा परिषदेसह मुदत संपलेल्या महापालिका, नगरपालिकांवर सध्या प्रशासकीय राजवट सुरू आहे. झेडपीचा कारभार २१ मार्च २०२२ पासून प्रशासकच करत आहेत.

आता दोन वर्षे उलटली तरी अद्याप



निवडणुकांना मुहूर्त सापडलेला नाही. त्यामुळे आपल्या गट आणि गणांत तयारी करणारे इच्छुक दोन

वर्षांपासून काहीसे भूमिगत झाल्याचे चित्र होते. मात्र लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने हे इच्छुक पुन्हा एकदा सक्रिय झाल्याचे दिसले. अर्थात त्यांना लोकसभेनंतर तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जाणार असल्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीचा चार जूनला निकाल असून यात केंद्रात एनडीएचे सरकार आले तर त्याच लाटेचा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये फायदा होऊ शकतो, असा अंदाज बांधून भाजपच्या राज्यातील काही नेत्यांचा निवडणुकांसाठी प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये या निवडणुका घेतल्या जाऊ शकतात.

या निवडणुका पार पडल्यानंतर ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात किंवा नोव्हेंबरमध्ये लगेचच विधानसभा निवडणुका होऊ शकतील.

त्या वेळी जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, महापौर, नगराध्यक्ष, नगरसेवक यांची नव्या दमाची फौज ही त्या त्या विधानसभेसाठी महायुतीला फायदेशीर ठरेल, असे आडाखा बांधण्यात येत असल्याचे समजते.केंद्रात आपले सरकार येणारच आहे, आता राज्यातही आपले सरकार आणण्यासाठी हेच पदाधिकारी विधानसभेला स्टार प्रचारक म्हणून गावागावात कामाला येणार असल्याचाही महायुतीतून सूर आहे. त्यामुळे विधानसभेपूर्वी स्थानिकस्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, यासाठी भाजपच आग्रही असल्याची सध्या जोरदार चर्चा आहे.

# बीड जिल्ह्यातील शेतकर्याला जुने कर्ज माफ करुन नविन कर्ज द्यावे नसता आंदोलन

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड आजिनाथ खेडकर

आज दोन वर्षे झाली बीड जिल्ह्यातील शेतकरी शेतमजुर कष्टकरी ऊसतोडणी कामगार यांना दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे.मागच्या वर्षी वेळेवर पाऊस पडला नाही पिक वाया गेली.जे पिक कुठ कुठ आलती ती आवकाळी पावसाने गेली.शेतर्याने जगायच कसं मागच्या वर्षी शेती साठी घेतलेले कर्ज फेडायचे कशाने आणि या वर्षी बि बियाणे खत घ्यायची कसी या चिंतेने शेतकरी हावाला दिल झालाय.माघच्या वर्षी पाऊस कमी झाला.पाणी टंचाई झाली म्हणून या वर्षी ऊस शेती एकदमच कमी झाली.म्हणुन आज ऊस तोडणी कामगारांना कोणी मुकादम आगाऊ उचल देईना.कारण मुकादमालाच कुठला कारखाना आगाऊ रक्कम उचल म्हणुन द्यायला तयार नाही.शासनाने बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केलता त्याच काय झालं.फक्त दुष्काळ जाहीर करायचा वल्गना करायच्या शेतकऱ्यांना आशाला लावयच वेळ मारुन नेहायची आणि शेतकऱ्यांना हातावर भोपळा द्यायचा हि अवस्था शासनाची झाली आहे.आज मुख्यमंत्री जमिनिवर यायला तयार नाही फक्त तोंडाने बोलतात घोषणा करतात पण कुठलीच सोय शेतकऱ्या साठी केली नाही आता पेरणी तोंडावर आणि पुढारी मंत्री फक्त पोकळ गप्पा मारण्यात आणि भुल थापा देण्यातच धन्यता मानतात.आज जनावरांना पाणी नाही चारा नाही एखादा पुढारी पुढे होऊन याच्या साठी पत्रकार परिषदेत घेऊन बोलायला तयार नाही.यांना फक्त जनतेची मते पाहिजेत पण जनतेची कामे नको.आता पेरणी करण्या साठी शेतकऱ्यांना जर पहिले कर्ज माफ करुन किंवा पुनर्गठन करुन जर नविन कर्ज नाही दिले तर शिवसेच्या वतीने शिवसेना संपर्कप्रमुख चंद्रकांत पोतदारसाहेब यांच्या आदेशाने मा.शिवसेना जिल्हा प्रमुख परमेश्वरजी सातपुते सर यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड आजिनाथ खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली तिर्वस्वरुपाच आंदोलन करण्यात येईल याची दखल मोहदया जिल्हा अधिकारी मुंढे मॅडम यांनी घ्यावी.आणि आजच बँकांना आदेश देऊन शेतकऱ्यांना नविन कर्ज देण्यात द्यावेत म्हणजे शेतकऱ्यांना शेतीची मशागत करता येईल व खत बियाणे वेळेला मिळतील.आणि ऊसतोडणी कामगार साठी सुद्धा एक बिनव्यजी कर्ज पध्दत सुरु करुन आगाऊ रक्कम उचल म्हणुन शासनाने द्यावी व त्यांच्या कामातुन वसुल करावी.शेतकरी शेतमजूर ऊस तोडणी कामगार जगले तरच तुम्ही पुढारी आणि नोकरशाहा जगेल नसता तुमचे हाल व्हायला वेळ लागणार नाही.एक दिवस भाजी पाला दुध शेतकऱ्यांनी थांबवले तर कळेल तुम्हाला.शेतकरी दिलदार आहे म्हणून तुम्ही आरामात खाता नाही तर उपासमारी होयला वेळ लागणार नाही पण माझा शेतकरी राजा उदार आहे.आणि या शेतकरी राजाला



मदत करा वेळ तसी आहे.फक्त भाषण करुन वल्गना करु नका तर प्रतेक्षात काहि तरी करा दुष्काळ जाहीर झाला त्याच काय झालं पाणकाळ जाहिर केला त्याच काय केलं गारपिट झाली त्याचे फक्त पंचनामेच केले.आसे पंचनामे किती दिवस करणार आणि खोटे आश्वासने देऊन खोटे पंचनामे करुन किती दिवस जनतेला फसवणार आहात.आता खोटे पणा चालणार नाही.जि घोषणा केली तीची आमबजाणी केल्या शिवाय पुढिल घोषणा केली तर जनता तुम्हाला फिरु देणार नाही.जर शेतकरी शेतमजुर ऊस तोडणी कामगारांना वेळेवर ५ जुनच्या आगोदर कर्ज उपलब्ध करून देले नाही तर शिवसेना जिल्हाभर नव्हे महाराष्ट्रात ऊध्दवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने आंदोलन करेल आसे शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड आजिनाथ खेडकर यांनी सांगितले.



# उमरी बँक ऑफ बडोदा शाखेच्या वतीने बॅकमित्रांचा सन्मान सोहळा संपन्न

उमरी (प्रतिनिधी)

उमरी :- शहरातील लोकप्रिय बॅक म्हणजे बॅक ऑफ बडोदा ह्या बॅक ऑफ बडोदा शाखा पेठ उमरी मागील वित्तीय वर्षात सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेत उत्कृष्ट काम केला आहे त्याचेच एक औचित्य साधून शाखेच्या वतीने सर्व बॅक मित्राच शाल श्रीफल देवून सत्कार करण्यात आला आहे.

सत्कार करण्याचा हेतु बॅक मित्रा मधील नवीन चैतन्य निर्माण करून बॅक ऑफ बडोदा च्या ग्राहकांना शेतकरीवर्ग, सामान्य नागरिक, बेरोजगार तरुण, गोल्ड लोन,बॅक लोन ,शेत पडक,पिक विमा पिक कर्ज,सह विविध क्षेत्रातील जास्तीत जास्त सेवेचा लाभ देऊन ग्राहकांना आनंदात ठेवण्याचे कार्य बॅक मित्राने केले आहेत.

त्याबद्दल त्यांचा सत्कार सन्मान करण्यात आला.हया उपक्रमाबद्दल बॅक ऑफ बडोदा शाखा अधिकारी पंकज मस्के सर यांचाही बॅक मित्र परिवार च्या वतीने आभार मानण्यात आले आहे. यावेळी,शाखेचे शाखाधिकारी पंकज मस्के साहेब,कृषी अधिकारी गजानन झाटे सर,असिस्टंट मॅनेजर अग्निवेश साहेब, मनोज डोपलवार,भगवान पाटील शिंदे, प्रवीण ढगे,करूणा ताई खंडलोटे,चंद्रकांत सुर्यवंशी,पवन गुंडेवार,बालाजी कपाले,संतोष गुन्टे, प्रभाकर जाधव, सतिश ढगे,अमोल वाघमारे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# एस. पी.साहेब पोलीस बॉय आकाश गायकवाडच्या धाडसाचं कौतुक करा..!.. अशोक हिंगे

## बीड पोलीसदलाच्या इभ्रतीसाठी फौजदार खाडेंना तात्काळ अटक करा

बीड ।प्रतिनिधी

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव घोटाळा गुन्ह्यांचे तपास अधिकारी डखढ पथकाचे सदस्य फौजदार हरिभाऊ खाडे यांनी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट गुन्हा तपास करताना ज्यांचा प्रकरणाशी काडीचाही संबंध नाही चक्क पोलीसबॉय आकाश गायकवाड यांना अवमानमानाची वागणुक देवून एक कोटीची लाच मागितली. पाच लाख टोकन म्हणून स्वीकारले. ठेवीदारांच्या हितासाठी योग्य दिशेने तपास चक्र फिरवणे हे पोलिसांचे कर्तव्य. केवळ पैसा उकळण्याच्या उद्देशाने अडवणूक करणे हा उद्योग खाडे यांचा चालू होता. यापूर्वी शेळके नावाच्या ठेवीदाराला बोलावून त्याला गंडवण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु ठेवीदार खमक्या निघाला आणि खाड्यांच्या हाती काही लागले नाही. मुख्य आरोपी बबन शिंदे ला अटक करण्यासाठी ठेवीदार आक्रोश करत असताना खाडे पैसे उकळण्याच्या धंद्यात मशगुल होते ही बाब अत्यंत गंभीर असून सामान्य माणसावर अन्याय करणारी आहे.

आकाश गायकवाड याने फौजदार खाडेंच्या दबावला न डगमगता धाडस दाखवून जागरूक नागरीकाचा कायद्याने हिसका दाखवला .फौजदार खाडे यांच्या रूपात डखढ पथकात बसलेला नीच चेहरा जनतेसमोर आणला.निर्भयपणे आकाशने उचललेले पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. एसपी साहेब आकाश गायकवाडच्या धाडसाचे कौतुक केल पाहिजे. तत्परतेने फौजदार हरिभाऊ खाडे व हे. कॉ. जाधवर यांना कोण आणि कधी अटक करणार हा प्रश्न सामान्य जनतेसमोर निर्माण झाला आहे. आठवडा गेला परंतु लाचखोरांना अद्याप अटक नाही.अशी प्रतिक्रिया जिजाऊ मल्टीस्टेट ठेवीदार संघर्ष कृती



समितीचे मार्गदर्शक अशोक हिंगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केली आहे.या पत्रकात पुढे म्हटले आहे की, जिजाऊ मल्टीस्टेट गुन्हा नोंदवून दहा महिने उलटले परंतु अद्याप त्याचा ठाव ठिकाणा पोलिसांना लागला नाही. फौजदार खाडे हे तर एसपी साहेबांच्या मर्जीतले अधिकारी गेली पाच दिवसापासून ते फरार आहेत. पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानुसार झडती घेऊन घरातुन एक कोटी पेक्षा अधिकची माया हस्तगत केली. फौजदार खाडे पूर्णपणे अडकले असून त्यांनी जिजाऊ मासाहेब मल्टीस्टेटच्या ठेवीदार बांधवांना दगा दिला आहे. हे सिद्ध झाले. लाचखोर फौजदारामुळे बीड पोलीस दलाची इभ्रत चव्हाट्यावर आली. अनेक मल्टीस्टेट मुळे जिल्ह्यातील आर्थिक वातावरण अस्थिर असून सामान्य जनता त्रस्त आहे. गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन खाडे आणि जाधवर यांच्या मुसक्या आवळून जेरबंद करणे आवश्यक आहे. या कामी जेवढी कुचराई होईल तेवढ्या लवकर लाचकांडातील पुरावे नष्ट होऊ शकतात. अनेक मालमत्ता पोलिसांच्या नजरेआड करण्यात आरोपी यशस्वी होऊ शकतो.

किमान बीड पोलीस दलाची इज्जत आणि शान कायम ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक महोदयांनी लाचखोर खाडे आणि जाधवर यांना तात्काळ अटक करावी. अन्यथा बीडच्या जनतेचा पोलीसावरील विश्वास भंग पावेल.काल ठेवीदारांच्या वतीने अशोकराव हिंगे, मारुतीराव तिपाले,शेख कुतुब भाई, भाऊसाहेब परसे, आर.एस.गायकवाड, रवींद्र पालीमकर, लक्ष्मण हाटवटे प्रवीण पोपळे, किसन जाधव, गोकुळ गायकवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन आकाश गायकवाडच्या धाडसाचे कौतुक करून धन्यवाद व्यक्त केले

# मोबाईल गेम ऐवजी मैदानी खेळ महत्वाचे - अरुण मानकर

शिरुरकासार (प्रशांत बाफना)

मुलांचा स्क्रीन टाईम प्रचंड वाढला असून या वेळेचे क्रिम टाईममध्ये रूपांतर करायचे असल्यास पालकांनी मुलांच्या हातातील मोबाईल काढून घेत त्याला मैदानावर खेळायला पाठवायला हवे. असे झाल्यास मुलांचे अर्ध्याहून अधिक प्रॉब्लेम दूर होतील असे प्रतिपादन स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक अरूण मानकर यांनी केले. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आणि सिद्धेश्वर संस्थान शिरूर कासार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवशीय पहिल्या एकता बालकुमार संस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते अध्यक्ष पदावरून बोलत होते.

एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, महिला आघाडीच्या डॉ.शोभा सानप, फौजी कैलास खेडकर, हरिप्रसाद




गाडेकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार गोकुळ पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. परभणी जिल्हाध्यक्ष पु.ना.बारडकर, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, डॉ.वैशाली बडे, संतोष बडे यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधला. मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शिरूर शहरात प्रथमच अशाप्रकारच्या शिबिराचे आयोजन केले गेले. सकाळी योगप्राणायाम, तद्नंतर गीतापाठ, बोधकथा, हस्तकला, चित्रकला, व्यंगचित्र, संगीत आणि सायंकाळी मैदानी खेळ, नृत्यकला, मुक्त संवाद याप्रकारे गेले पाच दिवस कार्यक्रम पार पडले.योगगुरू देविदास शिंदे, अशोक गुंजाळ, शिवलिंग परळकर यांनी मुलांना योगप्राणायाम, स्वामी विवेकानंद शास्त्रीजींनी गीतापाठ, नितीन कैतके यांनी हस्तकला, दहिफळे यांनी चित्रकला, सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार सुहास पालिमकर यांनी व्यंगचित्रे, उमेश कुलथे यांनी नृत्य, पु.ना.बारडकर यांनी कृतीयुक्त गीते, प्रकाश वाकळे यांनी बोधकथा शिकवल्या. शिबिराची सांगता विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाने झाली. मुलांनी स्वहस्ते तयार केलेल्या छोट्या छोट्या वस्तू, रंगीत चित्रे यांचे प्रदर्शन प्रमुख आकर्षण ठरले. वैयक्तिक आणि समुह नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी शिबीरार्थींचा उत्साह ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाला शिबीरार्थी, त्यांचे पालक, परिसरातील नागरिक आणि एकता फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.



## सुगंधकुट्टी बुद्धविहार येथे तथागत महात्मा गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात संपन्न

परळी ।प्रतिनिधी

तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या २५६८व्या जयंतीनिमित्त सुगंध कुट्टी बुद्धविहार परळी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण, तसेच सामूहिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले, सर्वप्रथम तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण उपासक सूर्यकांत समिंदरसावळे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी भीम नगर जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, तसेच जयंती उत्सव पदाधिकारी,तसेच या भागातील बौद्ध उपासक,उपासिका,बालाक बालीका मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह पूर्ण वातावरणात जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला.



आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी-तालुक्यातील नांदा या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक संतोष गजघाट सर यांच्या पुढाकारातून नांदा या छोट्या गावामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६८ वी जयंती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. यावेळी भाजपाचे युवा नेते सागर औटे, दादासाहेब औटे, शंकर औटे,सतीष औटे, राष्ट्रवादी युवा नेते जगदीश औटे,आप्पासाहेब औटे जालिंदर औटे,सह नांदा सेवा सोसायटी सदस्य तथा भारतीय बौद्ध महासभेचे दिनकर गजघाट,मारूती गजघाट,बारकू गजघाट,पत्रकार किरण जावळे,बाळासाहेब गजघाट यश गजघाट संदेश गजघाट दादा गजघाट,आर्यन गजघाट सहबाल धम्म उपासक ही मोठ्या संख्येने उपस्थित होते

# अरे बापरे! पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याला २८ हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ठोकल्या बेड्या

## तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्याच्या परवानगीसाठी शेतकऱ्यांकडून घेतली लाच

### बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई; लाचखोरी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले!

गेवराई । प्रतिनिधी

गलेलठ्ठ पगार असतानाही माजलगाव पाटबंधारे विभागाच्या परळी येथील कार्यकारी अभियंत्याने सात शेतकऱ्यांकडून २८ हजार रुपयांची लाच मागितली. तीच स्वीकारताना त्याला त्याच्याच कक्षात बीडच्यालाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बेड्या ठोकल्या. ही कारवाई बुधवारी दुपारी करण्यात



आली.राजेश आनंदराव सलगरकर (वय ३५, ह.मु. रा. अंबाजोगाई) हा परळी येथील माजलगाव पाटबंधारे विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहे. तो वर्ग १ चा अधिकारी आहे. तक्रारदार व साक्षीदार आणि गावातील इतर पाच शेतकऱ्यांचे मौजे चिंचोटी तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्याची परवानगी मिळावी, यासाठी कार्यकारी अभियंता यांच्याकडे अर्ज केला होता. ती देण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडून पाच हजार रुपये याप्रमाणे सात जणांचे ३५ हजार रुपये लाच मागितली होती. तडजोडीअंती प्रत्येकी चार हजार रुपये याप्रमाणे २८ हजार रुपये घेण्याचे ठरले. याची तक्रार एसीबीकडे येताच त्यांनी बुधवारी खात्री केली. त्यानंतर सापळा लावला. सलगरकर याने स्वत: आपल्या कक्षातच हे २८ हजार रुपये घेतले. या वेळी त्याला लगेच बेड्या ठोकण्यात आल्या. त्याच्याविरोधात परळी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

# पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बारावी परीक्षेच्या उच्चांकी निकालाची परंपरा कायम

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल घोषित झाला असून विद्यार्थ्यांनी उच्चांकी निकालाची परंपरा कायम राखली आहे गुणवंत विद्यार्थ्यांनी पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयाचे नाव रोशन केले आहे विज्ञान शाखा ९९.२०% वाणिजय शाखा १००% कला शाखा ७७.७७% असा निकाल घोषित झाला आहे विज्ञान शाखा प्रथम कु. राऊत साक्षी रवींद्र ८९.५०% द्वितीय हंगे मंदार मधुकर ८८.५०% तृतीय कु .राठोड रेश्मा आसाराम ८८% वाणिजय शाखा प्रथम कु. इंगोले नंदनी लक्ष्मण ८२.६७% द्वितीय गोळे आदित्य महादेव ८०.५०% तृतीय जाधव निलेश रामकृष्ण ७९.५० कला शाखा प्रथम कु. आमले शीतल देविदास ७९% द्वितीय कु. शिंदे कल्पना शिवाजी ७७.६७% तृतीय सुळे अविनाश वैजनाथ ७३.६७% वरील विद्यार्थी विज्ञान ,वाणिज्य व कला शाखेत प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाने गुणवंत ठरले आहेत सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर प्रशासन अधिकारी डॉ. राजा मचाले कार्यवाहक मुरलीधर राऊत प्राचार्य अंगदराव दहिफळे बी.डी.ओ.अभिजीत पाखरे पी.एस.आय. हनुमंत इंगळे सरपंच गहिनाथ पाखरे उपसरपंच सुभद्रा बाई इंगळे माजी सभापती उषाताई सरवदे चेअरमन भगवान पाखरे माजी सरपंच रामदास हांगे प्रकाश इंगळे रविंद्र राऊत संतोष कंटाळे समाधान इंगळे किरण चव्हाण माऊली शिरसाट गोरख सानप शिवलिंग परळकर विशाल सरवदे विष्णू हंगे शेख अलिम नाथा दुधाळ मुक्ताराम काशीद अभिजीत पंधारे पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे माध्यमिक पर्यवेक्षक राजेंद्र रांजवन प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर तसेच पाडळी नागरेवाडी तागडगाव ढोकवड ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.



**बीड ।प्रतिनिधी**

**जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत धारूर ता. कार्याध्यक्षपदी संतोष जावळे यांची निवड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी धारूर ता युवा कार्याध्यक्षपदी संतोष जावळे यांची निवड करण्यात आली व सर्कल अध्यक्षपदी विशाल भालेराव यांची निवड करण्यात आली यावेळी जावळे हे म्हणाले की धारूर तालुक्यामध्ये युवकाचे संघटन वाढवून पक्ष मजबूत करू यावेळी उपस्थित तालुका अध्यक्ष महेश शिरसाठ व पदाधिकारी उपस्थित होते.**

# अशोक हिंगे यांना मातृषोक

बीड ।प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांच्या आई सौ.शशिकला सुखदेव हिंगे यांचे वृद्धपकाळाने निधन अंत्यविधी सकाळी १०.०० वा मोंढा रोड अमरधाम बीड येथे होईल.



## भक्तिमय वातावरणात नृसिंह जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



अंबाजोगाई ।प्रतिनिधी

भक्त मंडळ परिवारातर्फे संतकवी दासोपंत समाधी स्थळ परिसरात असलेल्या पुरातन नृसिंह मंदीरात नृसिंह जन्मोत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा झाला. यानिमित्ताने येथील नृसिंह मूर्तीचे पूजन करण्यात आले. अभिषेक संपन्न झाला जन्मवेळी मंत्रोच्चाराच्या जयघोषात भाविकांनी गुलाल फुले उधळली कार्यक्रमाची सांगता दाळ पन्हे देऊन करण्यात आली. सर्वज्ञ दासोपंतांच्या दत्त सांप्रदायात तसेच शहरातील जुन्या रविवार पेठ भागातही नृसिंह जन्मोत्सव सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. यावेळी महिला, नागरिक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अदीबा नजीर बागवान हिचे बारावी परीक्षेत घवघवीत यश




बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार विभाग शहर अध्यक्ष नसरीन बागवान यांची कन्या अदीबा नजीर बागवान हिने बारावी परीक्षेत ७३.५० टक्के गुण घेवून घवघवीत यश संपादन केले. तिच्या यशाबद्दल नातेवाईकडून व सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## हर्षवर्धन राका याचे १२ वी परिक्षेत ९३% घेऊन सुयश

गेवराई । प्रतिनिधी

भाजपाचे ज्येष्ठ नेते सुरेशचंद्र राका यांचे नातू गेवराई येथील भारत सरकार नोटरी वकील राहूलकुमार सुरेशचंद्र राका यांचे चिरंजीव हर्षवर्धन राका याने फेब्रू -मार्च दरम्यान झालेल्या इयत्ता १२ वी वाणिज्य शाखेत ९३ टक्के गुण मिळवले . गेवराई येथील प्रतिष्ठित नागरिक भाजपा सरचिटणीस तथा वैद्यनाथ अर्बन बँकेचे स्थानिक सल्लागार ड . राहूलकुमार राका यांचे चिरंजीव हर्षवर्धन बलभीम महाविद्यालयात १२ वी कॉमर्सचे शिक्षण घेत होते . फेब्रू -मार्च २०२४ मध्ये उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या इयत्ता १२ वी परिक्षेत हर्षवर्धन याने इंग्रजी ८३ हिन्दी ९० अर्थशास्त्र ९३ अकौंट ९६ ओ . सी . मध्ये ९७ या विषयात सरासरी ९३ टक्के



गुण मिळवले व बलभीम महाविद्यालयात वाणिज्य शाखेत तिसरा क्रमांक मिळवला . १२ वी नंतर सी ए अभ्यासक्रम करणार असल्याचे हर्षवर्धन याने सांगितले . त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून सर्वत्र अभिनंदन होत आहे .

## मोमीन आयेशा इमरान चे इयत्ता बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश



बीड ।प्रतिनिधी

शहरातील मिल्लिया उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी मोमीन आयेशा इमरान हिने इयत्ता बारावीच्या परीक्षेत ८३.६७ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.मोमीन आयेशा ही व्यावसायिक इम्रान मोमीन यांची कन्या तर सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी मुहम्मद इस्हाक़ यांची नात आहे. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल मिल्लिया माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्रआप्तेष्ट, भाऊ मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि नातेवाईकांनी अभिनंदन केले असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हृदयी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ‘संविधान धोक्यात आहे’ अशी वक्तव्यं करु नका!

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील मतदानाचे सर्व टप्पे पार पडले असून देशभरात मतदानाचे दोन टप्पे बाकी आहेत. यासाठी राजकीय नेत्यांचा जोरदार प्रचार सुरु आहे. मात्र या प्रचारादरम्यान, एकमेकांवर टीका करत असतानाच दोन प्रमुख पक्ष म्हणजेच भाजप व काँग्रेस यांच्याकडून धार्मिक वक्तव्ये केली जात आहेत. टीकेची भाषा अत्यंत खालच्या पातळीला गेली आहे. याचं गांभीर्य लक्षात घेत भारतीय निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा दोन्ही पक्षाच्या पक्षाध्यक्षांना धार्मिक वक्तव्ये टाळण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच दोन्ही पक्षाध्यक्षांनी आपापल्या पक्षाला याबाबत नोटीस जारी करण्याची सूचना दिली आहे.

निवडणूक प्रचाराचा घसरलेला दर्जा पाहता आयोगाने भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना आपापल्या पक्षांच्या स्टार प्रचारकांना अयोग्य विधाने न करण्यासाठी, सावधगिरी बाळगण्यासाठी आणि शिष्टाचारात राहण्यासाठी औपचारिक नोटीस जारी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जात, समुदाय, भाषा आणि धर्माचे नाव घेऊन प्रचार करु नये, तसेच अग्निवीर योजना आणि भारतीय संरक्षण दलांचे/भारतीय सैन्याचे राजकारण न करण्याचा सल्ला काँग्रेसच्या स्टार प्रचारक आणि उमेदवारांना दिला आहे. निवडणुकीमुळे भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक वातावरणावर परिणाम होऊ नये, असेही आयोगाने म्हटले आहे.

निवडणूक आयोगाने संविधानासंदर्भात मल्लिकार्जुन खरगेंना एक विशेष सूचना दिली आहे. ‘संविधान धोक्यात आहे’ अशा प्रकारची वक्तव्यं न करण्याचा इशारा खरगेंना देण्यात आला आहे.

## माजलगाव बसस्थानकातुन महीलेचे पावणे दोन तोळ्याचे गंठण पळविले

माजलगाव-(प्रतिनिधी)

माजलगाव बसस्थानकातुन कोथाळा येथे जात असलेल्या महीलेचे बस मध्ये चढते वेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने पावणे दोन तोळ्याचे गंठण पळविल्याची घटना दि.१८ रोजी दुपारी घडली. वारंवार अशा घटना घडत असतांना पोलीस बघ्याची भुमिका घेत असुन एकाही चोरीचा तपास लागला नसल्याने पोलीसा विषयी संताप व्यक्त होत आहे.

कोथाळा येथील सपना भ्र गणेश कदम (२७)या दिनांक १८ रोजी सकाळी १० वा चे सुमारास त्यांचे पती सोबत मोटरसायकल वर माजलगाव येथे आल्या होत्या. आजारी असल्यामुळे अकोलकर हॉस्पीटल माजलगाव येथे दाखवुन उन जास्त असल्याने दोघे दुपारी ०१.३० वाजणेचे सुमारास बस स्टॅन्ड माजलगाव येथे आले असता बस स्टॅन्ड वर गर्दी होती गावाकडे जाणारी बस माजलगाव कोथाळा गाडी लागल्यावर गणेश याने बसमध्ये जागा धरुन दिली.त्या गर्दीमध्ये बस मध्ये चढुन बसत असतांना गर्दीचा फायदा घेत सपना यांच्या गळ्यातील १८ ग्रॅम.वजनाचे शार्ट गंठण अज्ञात चोरट्याने पळविले. बस स्टॅन्ड मधुन बाहेर पडत असताना हा प्रकार त्यांच्या लक्षात आला. यावर त्यांनी शहर पोलीस स्टेशन गाठले.पोलीसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केली आहे.दरम्यान माजलगाव बसस्थानकात अशा चोरीच्या घटना वारंवार घडत असतांना पोलीसांना यावर काहीच उपाय करता येत नसून चार दिवसापुर्वीच खेर्डावाडी येथील महिलेचे दागीने पळविल्याने सदर महीला धाय मोकलुन रडत होती.तर ड्युटीवरील पोलीस मात्र गायब होता.यामुळे या चोरट्यांना पोलीसांचाच आशीर्वाद तर नाही ना अशी शंका प्रवाशातुन व्यक्त होत आहे.

## केज तालुक्यातील येवता येथील महिला पाण्यासाठी आक्रमक !

गौतम बचुटे/केज

केज तालुक्यातील येवता येथील महिला आक्रमक झाल्या असून त्यांनी आज केज पंचायत समिती समोर प्रशासनाच्या विरुद्ध घोषणाबाजी करीत निदर्शने केले. या बाबतची माहिती अशी की तालुक्यातील येवता येथील मागासवर्गीय वस्तीत पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्याने येथील नागरिकांची हेळसांड होत आहे. त्यांच्या या रास्त मागणीसाठी रिपाइंचे तालुका अध्यक्ष दीपक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली केज पंचायत समितीच्या कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली. यावेळी महिलांनी ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामपंचायत यांच्या विरोधात महिलांनी घोषणाबाजी केली. या




आंदोलनात तालुका अध्यक्ष दीपक कांबळे, जेष्ठ नेते दिलीप बनसोडे, युवक तालुका उपाध्यक्ष उत्कर्ष काळे, सुग्रीव गायकवाड, धनंजय गायकवाड, वैभव जाधव, बाळासाहेब जाधव, अक्षय गायकवाड, सिंधुबाई गायकवाड, सविता शिंदे, मिराबाई जाधव, मीना गायकवाड, कोमल गायकवाड, गांधारी गायकवाड, प्रकाश जोगदंड, जयश्री गायकवाड, श्रीमंत जाधव,जानकाबाई जाधव, शीतल जाधव, लक्ष्मीबाई जाधव, समाधान जाधव, अनंत काळे, अभिषेक जाधव, अविनाश काळे यांच्यासह अनेकजण उपस्थित होते. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी राठोड यांनी आंदोलकांची भेट घेवून तात्काळ टँकर सुरू करण्याचे आश्वासन दीपक कांबळे आणि आंदोलकांना दिले.पंचायत समितीचा हजगर्जीपणा ! :- येवता येथील पाणी टंचाई बाबत सरपंच विलास जोगदंड आणि ग्रामसेवक वाघ यांनी १५ एप्रिल रोजी पंचायत समिती कार्यालयात टँकर मंजुरीचा प्रस्ताव पाठविलेला आहे. परंतु त्याला एक.महिन्या पेक्षा जास्त कालावधी उलटून गेला तरी सदर प्रस्ताव पंचायत समितीने केक तहसीलच्या पाणी टंचाई विभागाकडे पाठविला नाही.विशेष बाब म्हणून तहसीलदारांनी दिली टँकरला मंजुरी :- येवता येथे जलजीवन मिशन अंतर्गत नळ योजना मंजूर असल्याने येथे टँकर सुरू करण्या संदर्भात तांत्रिक अडचण होती. मात्र पाण्याचे जलस्त्रोत व उदभव कोरडे असल्याने विशिष बाब म्हणून टँकरचा प्रस्ताव मंजूर केला असून दोन दिवसात टँकर सुरू करण्यात येईल.

## १२ वीच्या परीक्षेत जवळा उच्च महाविद्यालयातून चि. सुरज वाव्हळ प्रथम

बीड (प्रतिनिधी)

फेब्रुवारी मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल काल मंगळवार दि. २१ रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये बीड शहरा पासून जवळ असलेल्या जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून चि. सुरज बाळासाहेब वाव्हळ याने ८०.००% गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याने मिळवलेल्या या उज्वल यशाबद्दल त्याचे संस्थेचे संस्थाचालक माजी आमदार श्री. राजेंद्र जगताप साहेब, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग आणि त्याच्या आई-वडील यांच्यासह मित्र परिवारांनी त्याचे अभिनंदन केले.



विद्यार्थी देशातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा समजला जाणारा इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल बारावी काल मंगळवार दिनांक २१ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात आला. या परीक्षेत बीड शहरापासून जवळ असलेल्या म्हाळस जवळा येथील जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला. या मध्ये शांत, संयमी आणि हुशार अशी ओळख असलेल्या चि. सुरज वाव्हळ याने ८०.०० टक्के गुण संपादन करून प्रथम क्रमांक मिळवला. चि. सूरज हा लहानपणापासून जिद्दी आणि मेहनती विद्यार्थी होय. त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आणि गरिबीची आहे. अशा या हलाखीच्या आणि गरिबीच्या परिस्थितीत त्याने जिद्दीने अगदी मन लावून अभ्यास केला. १२ वीच्या परीक्षेत मिळालेल्या या घवघवीत यशात त्याने आपल्या आई-वडिलांसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापकांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. त्याच्या या घवघवीत यशाबद्दल त्याचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जगताप साहेब यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळ, प्राचार्य भगवानराव गव्हाणे, पर्यवेक्षक रमेशराव डोळे, वरिष्ठ लिपिक शेख सर यांच्यासह प्रा. बी.टी. जोगदंड , प्रा. ए. एस.पटवारी, प्रा. जी. बी. घुमरे, प्रा. एन. के. चंदनशिवे आणि माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. तसेच म्हाळस जवळा आणि पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमी पालक आणि नागरिकांनी सुरज वाव्हळ याच्यासह महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षक प्राध्यापक वर्गाचे अभिनंदन करून कौतुक केले .

# अज्ञात वाहान अपघात प्रकरण

### मयतच्या नातेवाईकाकडून मागासवर्गीय इसमास जातीवाचक शिवीगाळ अन् जिवे मारण्याची धमकी ?

पोलीसांसह वरिष्ठाकडे कार्यवाहीची मागणी

फुलंब्री (प्रतिनिधी)

फुलंब्री तालुक्यातील शेवता - आळंद रोडवर १५ मे रोजी पहाटे अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघाती मरण पावलेल्या इसमाच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा खोटा आरोप करून दोनशे ते अडीचशे लोकांच्या जमावा देखत मला अश्लील भाषेत व जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या इसमान विरुद्ध कादेशीर कारवाही करण्यात यावी अशी मागणी शेवता येथील मागासवर्गीय इसम सुखदेव साठे यांनी ग्रामिण पोलीस अधीक्षक यांच्या सह प्रादेशिक समाज कल्याण आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे .

शेवता - आळंद रोडवर १५ मे पहाटे ५ ते ६ वाजेदरम्यान अज्ञात वाहानाच्या धडकेत सत्यात्तर वर्षीय इसम इसमाचा मृत्यु झाला होता . या बाबत सुखदेव भीमराव साठे, वय ५२, (अनुसूचित जाती) मौ. शेवता बु तालुका फुलंब्री, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तकार अर्ज निवेदन दिले की, शेवता येथे शेवता आळंद रोडवर दि. १५/०५/२०२४ रोजी अज्ञात वाहनाने उडविल्याने इसमाचा मृतू झाल्याचा गुन्हा वडोद बाजार पोलीस यांचाकडे गुन्हा दाखल आहे. असे असतांना १८/०५/२०२४ शनिवार रोजी सकाळी ०१.०० वाजेच्या सुमारास शेवता गावचे सरपंच यांचे बंधू राजू औचितराव तुपे यांनी साठे यांना मोबाईलवर कॉल करून सांगितले की गावाच्या वेशीवर सर्व ट्रॅक्टर वाल्यांना संतु तुपे यांच्या अपघाताची चौकशी करण्यासाठी बोलावले आहे, तुम्ही पण ताबडतोब या ठिकाणी या असा कॉल केल्यानंतर ते लगेच गावच्या वेशीवर (पारावर) गेले, त्या ठिकाणी राजू तुपे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व २०० ते २५० लोकांचा जमाव एकत्र बसलेला होता. शेवता बु येथील संतू भागाजी तुपे या वृद्धाचा दिनांक १५/०५/२०२४ बुधवार रोजी अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघाती मृत्यू झालेला आहे, या अपघातासंदर्भात गावातील सर्व ट्रॅक्टर चालक मालकांना या ठिकाणी बोलवण्यात आले होते, गावांमध्ये माझ्यासह अंदाजे १५ ते २० शेतकऱ्यांकडे ट्रॅक्टर आहेत, मात्र मयत संतू भागाजी तुपे यांचे नातेवाईक व त्यांच्या सोबत असलेले सात ते आठ लोक मला म्हणाले की, या मांगट्याच्या ट्रॅक्टरनेच संतू दाजीला उडविले आहे, याचे हात पाय तोडले पाहिजे, मांगट्या तू दोन तासांमध्ये अपघाताचा गुन्हा कबूल कर नाहीतर आम्ही आमच्या पद्धतीने तुला बघू असे बोलत मयत संतु तुपे यांचा साला (नाव माहित नाही) यांच्यासह सात ते आठ लोकांनी मला अश्लील भाषेत शिवीगाळ करत मागंट्या हा ऑक्सडेंट तुपल्याच ट्रॅक्टरने झाला आहे, आज दिवसभरात जर अपघाताचा गुन्हा कबूल केला नाही तर तुला गावात राहू देणार नाही, तुझ्या घरातल्या सगळ्यांची धिंड काढून गावाबाहेर हाकलून देऊ अशी धमकी दिली,भागाजी तुपे यांच्या परिवारासोबत अकरा वर्षांपूर्वी शेतातील रस्त्यावरुन त्यांचा वाद झाला होता, या वादामुळेच मयत संतू भागाजी तुपे यांचे नातेवाईक मला दबाव टाकत खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करत आहेत, तसेच मला व माझ्या कुटुंबातील सदस्यांना जीवे मारण्याची धमकी देत आहेत, मी मांग जातीतील नागरिक असल्याचे माहित असताना सुद्धा मला जाणून बुजून मानसिक त्रास देत आहेत, यापूर्वी पाल येथे पाटील समाजाकडून मातंग तरुणाची भर चौकात जमावाने सामुदाहिक रित्या मारहाण केल्याने मृत्यु झाल्याची घटना घडली होती . त्याच घटनेची शेवता गावात पुनरावृत्ती होऊ शकते .

तरी मा. पोलीस निरीक्षक साहेब यांनी मयत संतू भागाजी तुपे यांच्या नातेवाईकाकडून मला व माझ्या कुटुंबीयांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून आम्हाला तात्काळ पोलीस संरक्षण देण्यात यावे, तसेच १८/०५/२०२४ शनिवार रोजी मला अश्लील भाषेत व जातिवाचक शिवीगाळ करणाऱ्या मयत संतु तुपे यांचा साला व त्याच्यासोबत असलेल्या सात ते आठ लोकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही असे निवेदन

सुखदेव भीमराव साठे शेवता बु, यांनी मा, अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती आयोग, महाराष्ट्र मा, विभागीय आयुक्त साहेब, छत्रपती संभाजीनगर . मा, जिल्हाधिकारी साहेब, छत्रपती संभाजीनगर मा, उप विभागीय अधिकारी साहेब, पैठण-फुलंब्री मा, उपविभागीय पोलिस अधिकारी साहेब, छत्रपती संभाजीनगर मा. तहसीलदार साहेब कार्यालय फुलंब्री मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण अधिकारी साहेब, छ. संभाजीनगर . मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, छ. संभाजीनगर यांच्या सह ग्रामिण पोलीस अधिक्षक व पोलीस ठाणे वडोद बाजार यांना दिले आहे .

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT